# विद्यानंद को-ऑप. बँक लि; सोलापूर

आमचे प्रेरणास्त्रोत व श्रध्दास्थान



प.पु. सिध्दांत चक्रवर्ती श्वेतपिच्छाचार्य १०८

## श्री विद्यानंदजी मुनिराज

## २४ वा वार्षिक अहवाल

सन २०२०-२०२१

Website : www.vidyanandbank.com | Email : ceo@vidyanandbank.com

# विद्यानंद को-ऑप. बँक लि., सोलापूर

२४ वा
वार्षिक अहवाल
सन २०२०-२०२१

## * विद्यमान संचालक मंडळ *

अध्यक्ष



श्री. सुधीर श. गांधी

उपाध्यक्ष



श्री. अमृतलाल ह. पमनानी

संचालक



श्री. संजय श. गांधी

संचालक



श्री. सुर्यकांत ना. शहा

संचालक



श्री. परमेष्टी गौ. गांधी

संचालक



श्री. प्रकाश म. हत्ती

संचालक



श्री. जीवन गो. बीडकर

संचालक



श्री. शिवदत्त न. कुनी

संचालक



श्री. मनोज मे. दोशी

संचालक



श्री. दयानंद च. मंठाळकर

संचालक



श्री. शत्रुघ्न बा. होगले

संचालक



श्री. दत्तात्रय कृ. डांगे

संचालिका



डॉ. मयुरा मो. शहा

संचालिका



श्रीमती मीना रा. शहा

तज्ञ संचालक



श्री. राजू भि. शहा

तज्ञ संचालक



श्री. जयंत स. कुलकर्णी




# स्व. शरदचंद्र खुशालचंद गांधी

जन्म : ०५ सप्टेंबर १९३६ स्वर्गवास : ०५ एप्रिल २०२१

## संस्थापक अध्यक्ष

**मा. स्व. शरदचंद्र खुशालचंद गांधी**
(मो. ९३७०४११४११)

## विद्यमान संचालक मंडळ

**श्री सुधीर शरदचंद्र गांधी**
अध्यक्ष
(मो. ९३७०४२५५००)

**श्री. अमृतलाल हासानंद पमनानी**
उपाध्यक्ष
(मो. ९४२०७८०८८०)

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. संजय शरदचंद्र गांधी | मो. ९३७०४०४५४६ | श्री. मनोज मेघचंद दोशी | मो. ९३७०४०५८०० |
| श्री. सूर्यकांत नानचंद शहा | मो. ९४०५४८०७२५ | श्री. दत्तात्रय कृष्णा डांगे | मो. ९८५०३४१५३४ |
| श्री. परमेष्टी गौतमचंद गांधी | मो. ९४२३३२८४१३ | श्री. दयानंद चंद्रकांत मंठाळकर | मो. ९९२२२०७००७ |
| श्री. जीवन गोपाळराव बीडकर | मो. ९८५००१९७७७ | डॉ. मयूरा मोतीचंद शहा | मो. ९४२३५८७०५४ |
| श्री. प्रकाश मल्लिकार्जुन हत्ती | मो. ९४२२०६६९७९ | श्रीमती मीना राजन शहा | मो. ९३७३९६६०४४ |
| श्री. शिवदत्त नरसप्पा कुनी | मो. ९३२५२३८४८६ | श्री. राजू भिकूलाल शहा (तज्ञसंचालक) | मो. ९४२३०६७४१० |
| श्री. शत्रुघ्न बाबीर होगले | मो. ९७६३२००७३० | श्री. जयंत सदाशिव कुलकर्णी (तज्ञसंचालक) | मो. ९८८१३२१७१७ |

**श्री. चंद्रकांत सखाराम वाणी**
सरव्यवस्थापक
(मो. ९३७०१२१२०३)

- बाळीवेस शाखा – फोन नं. (०२१७) २६२५२११ vcbl.ho@vidyanandbank.com
- नातेपुते शाखा – फोन नं. (०२१८५) २६३३०१ natepute@vidyanandbank.com
- अकलूज शाखा – फोन नं. (०२१८५) २२५२११ akluj@vidyanandbank.com
- पंढरपूर शाखा – फोन नं. (०२१८६) २२५२११ pandharpur@vidyanandbank.com
- विजापूर रोड शाखा – फोन नं. (०२१७) २३०५२११ vroad@vidyanandbank.com
- फलटण शाखा – फोन नं. (०२१६६) २२५२११ phaltan@vidyanandbank.com
- इंदापूर शाखा – फोन नं. (०२१११) २२५३११ indapur@vidyanandbank.com

**१३, जैन बोर्डिंग कॉम्प्लेक्स, बाळीवेस, सोलापूर – ४१३००२**
**फोन नं. (०२१७) २६२५२११**

website - www.vidyanandbank.com | e-mail :- ceo@vidyanandbank.com

## • वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस •

(फक्त सभासदांकरिता)

बँकेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, विद्यानंद को. ऑप. बँक लि., सोलापूर या बँकेची २४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **गुरूवार दि. ३० सप्टेंबर २०२१ रोजी सकाळी १०.३० वाजता ''गांधी नाथा रंगजी दिगंबर जैन जनमंगल प्रतिष्ठान'' बाळीवेस, सोलापूरच्या** प्रांगणातील हॉलमध्ये बोलविण्यात येत आहे. सदर सभा ऑनलाईन पद्धतीने म्हणजेच व्हीसी किंवा ओएव्हिएम (Other Audio Visual Means) द्वारे होणार आहे. कोविड १९ महामारीमुळे शासनाचे सदर सभेस जास्तीत जास्त तसेच ५० लोकांची उपस्थितीस परवानगी दिल्या कारणाने सदर सभा वरीलप्रमाणे ऑनलाईन पद्धतीने खालील विषयांवर विचार विनिमय करून निर्णय घेण्यासाठी आयोजित केलेले आहे, तरी सदर सभेस सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे, ही नम्र विनंती.

## • सभेपुढील विषय •

०१. आपल्या बँकेचे संस्थापक अध्यक्ष मा.स्व. शरदचंद्र खुशालचंद गांधी यांचे दि. ०५ एप्रिल २०२१ रोजी दुःखद निधन झाले आहे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहणे.
०२. मागील दिनांक २२ डिसेंबर २०२० रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.
०३. सन २०२०-२१ या वर्षाचा वार्षिक अहवालातील वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेले ताळेबंद व नफा-तोटा पत्रक स्विकारणे व मंजुरी देणे तसेच मा. वैधानिक लेखापरिक्षक यांचेकडून आलेला वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे.
०४. सन २०१९-२० सालाचा वैधानिक लेखापरिक्षणाचा दोष दुरूस्ती अहवाल माहिती व मंजूरीसाठी.
०५. मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२०-२०२१ चा नफा वाटणीस मंजूरी देणे.
०६. सन २०२१-२२ सालाकरीता मा. संचालक मंडळाने तयार केलेले उत्पन्न व खर्चाचे अंदाज पत्रक मंजूर करणे व सन २०२०-२०२१ च्या अंदाज पत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजूरी देणे.
०७. सन २०२१-२०२२ सालाकरिता बाहेरील कर्ज मर्यादा ठरविणे.
०८. सन २०२१-२०२२ सालाकरिता वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणुकीस व त्यांच्या मानधनास मंजुरी देणे.
०९. बँकेचे संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची माहिती घेणे.
१०. महाराष्ट्र शासनाने नागरी सहकारी बँकांना लागू केलेल्या एकरकमी कर्ज परतफेड योजना व तडजोड योजनेअंतर्गत थकित कर्जदारांना व्याजात दिलेले सुट रकमेस मान्यता देणे.
११. बँकेच्या पोटनियम दुरूस्तीस मान्यता देणे.
१२. सन २०२०-२१ मध्ये बँकेचे सभासद व कर्मचारी यांचेसाठी सहकार शिक्षण व प्रशिक्षण कार्यक्रम राबविणेबाबत विचार करणे.
१३. बँकेच्या सदर वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहू न शकणाऱ्या सभासदांच्या अनुपरिस्थतीस मान्यता देणे.
१४. मा. अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर विचार करणे.

सोलापूर
दि. १४ सप्टेंबर २०२१

**श्री. सुधीर शरदचंद्र गांधी**
अध्यक्ष

## • सुचना •

०१. कोरमअभावी सभा तहकुब झाल्यास ती सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी ठरलेल्या वेळेनंतर अर्ध्यातासाने सुरू होईल. त्यासाठी कोरमची आवश्यकता भासणार नाही.
०२. सभेच्या कामकाजात सहभागी होण्यासाठी सभासदांना त्यांच्या मोबाईल क्रमांकावर स्वतंत्र लिंक पाठविण्यात येईल. त्यानुसार सभासदांनी बँकेच्या नजीकच्या शाखेमध्ये संपर्क साधून मोबाईल क्रमांक, ईमेल, व्हॉट्स सुविधा असलेल्या मोबाईल क्रमांकाची नोंद करावी.
०३. कोविड १९ महामारीच्या पार्श्वभूमीवर सभेमध्ये सर्व शासकीय आदेशांचे, वैद्यकिय तज्ञांचे, दिशानिर्दशांचे पालन करून ही सर्व साधारण सभा घेण्यात येणार आहे. तरी सर्व सभासदांनी विनंती की त्यांनी सदर सभेस उपस्थित राहताना योग्य ती खबरदारी घ्यावी.
०४. वार्षिक अहवालाची प्रत बँकेच्या सर्व शाखांमध्ये व बँकेच्या वेबसाईटवर (www.vidyanandbank.com) उपलब्ध राहील.
०५. दि. ३१/०३/२०२१ अखेरच्या ताळेबंद, नफा-तोटा पत्रकासंबंधी काही माहिती विचारावयाचे असल्यास त्यांनी दि. २३/०९/२०२१ पर्यंत कार्यालयीन वेळेत बँकेच्या प्रत्येक शाखा व्यवस्थापकांकडे लेखी कळवावे. त्यानंतर आलेल्या प्रश्नांचा विचार केला जाणार नाही.
०६. ज्या सभासदांनी सन २०१७-१८ या वर्षाचे लाभांश घेतलेले नाहीत त्यांनी कार्यालयीन वेळेत बँकेतून घेवून जावे. तसेच लाभांश खातेवर जमा होण्यासाठी प्रत्येक सभासदांने आपल्या बँकेच्या नजीकच्या शाखेत बचत खाते उघडावे किंवा बाहेरील बँकेत असलेले बचत खात्याचा तपशील देण्यात यावा.

## • विशेष सुचना •

०१. ज्या सभासदांनी खातेस वारस नेमून दिलेले नसतील किंवा ज्यांना वारस नेमून द्यावयाचा असेल त्यांनी कृपया नॉमिनी फॉर्म भरून देऊन बँकेत दाखल करण्याची व्यवस्था करावी.
०२. २० वी वार्षिक सर्वसाधारण सभा विषय नं. ११ (०२) नुसार ज्या सभासदांनी जुने भाग प्रमाणपत्र जमा करून नविन भाग प्रमाणपत्र कण्याकरिता दिले होते ते प्रमाणपत्र तयार झाले असून मुख्य शाखेतून घेऊन जावे.
०३. आपल्या बँकेनी मा. आर.बी.आयच्या मार्गदर्शक सुचनेनुसार C-KYC प्रणालीची अंमलबजावणी केलेली आहे ज्या सभासदांनी व खातेदारांनी अद्याप C-KYC अद्यायावत केलेली नाही त्यांनी पॅन कार्ड, आधारकार्ड व कलर फोटो यांची प्रत नजीकच्या शाखेत जमा करण्यात यावी.
०४. आपला पत्ता बदललेला असल्यास नवीन पत्ता, टेलिफोन व मोबाईल नंबर बँकेस लेखी स्वरूपात त्वरीत कळवावा.
०५. कृपया सभासदांनी सभेस येताना आपली नोटीस प्रत घेवून यावी.

**✻ मास्क व सॅनिटायझरचा वापर करावा आणि सोशल डिस्टंसिंगचे पालन करावे ✻**

# २४ वा वार्षिक अहवाल २०२०-२०२१

सन्माननीय सभासद बंधू भगिनी,

प.पू. आचार्य श्री विद्यानंदजी मुनिराज यांना भावपूर्ण अभिवादन करून आपणासर्वांचा प्रतिनिधी या भूमिकेतून आपल्या बँकेचा २४ वा वार्षिक अहवाल, दि. ३१ मार्च २०२१ अखेरचा ताळेबंद, नफा-तोटा पत्रक, लेखापरीक्षकांचा अहवाल व अन्य विवरणपत्रे आपल्यासमोर मांडत आहोत.

बँकेची स्थापना केल्यापासूनच आम्ही सर्व संचालक मंडळ आपल्या सर्वांच्यावतीने आपले प्रतिनिधी म्हणून पारदर्शकपणे, शर्थीने, प्रामाणिकपणे व सचोटीने कार्यरत आहोत. एखादी संस्था चालवताना प्रामाणिकपणा व सचोटी याचे काय महत्त्व व फळ आहे हे वेळोवेळी येणारे प्रसंग व त्यातून मिळणारा मार्ग हे अधोरेखित करतात. आपण सर्वांनी आमच्या याच सचोटी, पारदर्शकपणा व प्रामाणिकपणा यांना दिलेल्या प्रतिसादाबद्दल मनापासून आभार. यापुढे देखील आपल्या बँकेचा कारभार असाच पारदर्शकरित्या, प्रामाणिकपणे व सचोटीने चालवण्याचा आमचा निर्धार असून आपणा सर्वांचे सहकार्य असेच यापुढेही लाभेल अशी अपेक्षा आहे.

भारत सरकारच्या निर्णयाला अनुसरून व मा. आर.बी.आय. यांचे वेळोवेळीचे धोरण तसेच बदलत्या काळाची गरज लक्षात घेऊन बँकेने आपल्या विद्यानंद को-ऑप. बँकेची देखील विकसनशील बँकेकडून विकसित बँकेकडे वाटचाल सुरू केली आहे. त्याचाच भाग म्हणजे बँकेने सुरू केलेली सीबीएस (कोअरबँकींग) प्रणाली आणि Net Banking ची सेवा. आता आपल्या सभासद व ग्राहकांना घरबसल्याच बऱ्याच बँकींग सुविधांचा जसे, चेकबुक मागणी, खाते शिल्लक माहिती, नियमित खातेउतारा, गुंतवणूक व्याजाचे सर्टीफिकेट, बँकेत पॅन नंबर व आधारकार्ड नंबर नोंदवणे व अद्यावत करणे याचा उपभोग घेता येईल.

आपल्या बँकेचे कार्यक्षेत्र सोलापूर, पुणे, सांगली, सातारा, उस्मानाबाद व अहमदनगर या सहा जिल्ह्यात आहे. आपल्या बँकेचे बाळीवेस सोलापूर, नातेपुते, अकलूज, पंढरपूर, विजापूर रोड सोलापूर, फलटण व इंदापूर शाखांचे कामकाज समाधान कारक आहे.

आपल्या बँकेची ३१/३/२०२१ अखेरची आर्थिक स्थिती सांगताना आनंद वाटतो की, आपल्या बँकेची एकूण ठेवी १६३.१९ कोटी असून, कर्ज वाटप १००.१२ कोटी आहे, बँकेने ६१.३५% सीडी रेशो राखला आहे. बँकेला ३१/३/२१ अखेर एकूण १४२.५१ लाख ढोबळ नफा झाला असून आयकर, संशयीत व बुडीत निधी, उत्तम कर्ज तरतूद, लेखापरिक्षण फी इ. करिता एकूण रु. ११९.१९ लाखाची तरतूद वजा जाता निव्वळ नफा रु. २३.३२ लाख इतका राहतो. सदर नफ्यापैकी रु. ६ लाख राखीव निधी, रु. १७.३० लाख लाभांश देय व रू. ०.०२ लाख धर्मदाय निधीस वर्ग करण्याची शिफारस संचालक मंडळाने केलेली आहे.

आपल्या बँकेची www.vidyanandbank.com नावाने वेबसाईट सुरू केली असून बँक C-kyc, Net Banking, SMS बँकींग, RTGS/NEFT सर्व प्रकारेच Tax Payments, IMPS, फोन बँकींग सुविधा, मिस्ड कॉल अलर्ट सेवा आपल्या ग्राहकांना देत आहे.

जागतिकीकरण, शासनाची मुक्त अर्थव्यवस्था व खाजगी बँकांचा बँकिंग क्षेत्रात शिरकाव तसेच मा. रिझर्व बँकेचे वेळोवेळी बदलते धोरण यामुळे सहकारी बँकासमोर गळचेपी स्पर्धा निर्माण झालेली आहे. आपल्या बँकेच्या आर्थिक स्थितीचे वर्णन थोडक्यात पुढे दिले आहे. आर्थिक मजबूत बँक समजण्यासाठी रिझर्व बँक काही निकष वापरते. त्यामध्ये भांडवल पर्याप्तता, (सी.आर.ए.आर), निव्वळ एनपीए चे प्रमाण, निव्वळ नफा, राखीव रोखता (सी.आर.आर) आणि एस.एल.आर यांची निर्धारित पातळी सांभाळणे यांचा समावेश आहे.

आपणांसर्वांचे सहकार्य, महाराजांचे आशीर्वाद व आमचे प्रयत्न या त्रिवेणी संगमातून साध्य झालेल्या प्रगतीची विभागवार माहिती खालीलप्रमाणे आहे.

**सभासद संख्या व भागभांडवल**

बँकेचे अधिकृत वसूल भागभांडवल रु. ५२०.७५ लाख आहे. अहवाल सालामध्ये दिनांक ३१ मार्च २०२१ अखेर सभासद संख्या ३८०० इतकी आहे.

**भांडवल पर्याप्तता (सी.आर.ए.आर)**

रिझर्व बँकेच्या भांडवल पर्याप्तता निकषानुसार (Capital Adequacy Norm) नागरी सहकारी बँकांसाठी भांडवल पर्याप्तता प्रमाण लागू आहे. बँकेच्या सक्षम स्थितीकरता हा निकष महत्त्वाचा आहे. ३१ मार्च २०२१ रोजी बँकेचे भांडवल पर्याप्तता प्रमाण (सी.आर.ए.आर) १४.५० टक्के आहे. तो रिझर्व बँकेच्या निकषांनुसार ९.०० टक्केपेक्षा जास्त असणे गरजेचे आहे. याचाच अर्थ बँकेचे जोखीम व्यवस्थापन योग्य आहे असे म्हणता येईल.

**निधी**

दिनांक ३१ मार्च २०२१ अखेर स्वनिधी व इतर निधी मिळून रु. १६३२.४४ लाख इतका असून गतवर्षीच्या तुलनेने त्यात रु. १४१.७२ लाखाने वाढ झालेली आहे.

**ठेवी**

दिनांक ३१ मार्च २०२० अखेर ठेवी रु. १६२६६.८९ लाख इतक्या होत्या. अहवालसाली त्यामध्ये रु. ५१.७६ लाख इतकी वाढ होऊन दिनांक ३१ मार्च २०२१ अखेर ठेवी रु. १६३१८.६५ लाख इतक्या झाल्या आहेत. बँकेच्या ठेवी वाढवण्यामध्ये असंख्य ठेवीदार सभासद, संचालक यांचा मोलाचा वाटा आहे. इतर व्यापारी बँकांपेक्षा आपल्या बँकेचे ठेवीवरील व्याजदर जास्त असून जेष्ठ नागरिकांच्या ठेवीवर प्रचलित व्याज दरापेक्षा अधिक व्याजदर देण्यात येते.

**ठेवींचा विमा**

पाच लाखापर्यंत ठेवीस डिपॉझिट इन्शुरन्स ची योजना लागू आहे. ग्राहकांच्या ठेवीच्या सुरक्षिततेसाठी डिपॉझिट इन्शुरन्स अँन्ड क्रेडिट गॅरंटी कार्पोरेशन (DICGC) मुंबई या रिझर्व बँकेच्या ठेव विभागास बँक विमा हप्ता पाठवीत असते. बँकेने दि. ०८/०५/२०२० रोजी रु. ११.५५ लाख व दि. २८/१०/२०२० रोजी ११.५२ लाख इतका डिपॉझिट इन्शुरन्स अँन्ड क्रेडिट गॅरंटी कार्पोरेशन (DICGC) मुंबई चा प्रिमियम भरला आहे.

**कर्जे**

बँकेच्या व्यवसायात कर्ज व्यवहार हा महत्त्वाचा घटक आहे कारण चांगल्या कर्ज व्यवहारामुळेच बँकेची नफा क्षमता वाढत असते. आपल्या बँकेची दिनांक ३१ मार्च २०२० अखेरची एकूण कर्जे रु. ९७२९.२३ लाख इतके होते ते वाढून दिनांक ३१ मार्च २०२१ अखेर रु. १००११.९५ लाख आहे. गतवर्षीच्या तुलनेत यात निव्वळ वाढ रु. २८२.७२ लाखाने झालेली आहे. ही वाढ विविध प्रकारच्या व्यावसायिकांना सामावून घेतल्यामुळे झालेली आहे. आपल्या बँकेचा मार्च २०२० अखेर सी.डी. रेशो ५९.८१ टक्के होता, अहवाल सालामध्ये मार्च २०२१ ला बँकेने तो ६१.३५ टक्के राखला आहे. मा. रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक सूचनानुसार बँकेने ट्रान्सयुनियन सिबिल लि., क्रिफ हायमार्क क्रेडिट इन्फॉरमेशन सर्व्हिसेस, एक्सपिरियन क्रेडिट इन्फॉरमेशन कंपनी ऑफ इंडिया प्रा. लि., व इक्वीफॅक्स क्रेडिट इन्फॉरमेशन सर्व्हिसेस प्रा.लि., या चारही संस्थांचे सभासदत्व घेतले असून त्यांच्या मार्फत पुरवण्यात येणाऱ्या सुविधांचा वापर करत आहे. तसेच मा. आर.बी.आय.च्या मार्गदर्शक सुचनेनुसार सदर संस्थांना आपल्या कर्जदारांच्या कर्जाची माहिती वेळोवेळी सादर करीत आहोत. बँकेच्या सभासदांनी कर्ज वितरणात वाढ होऊन उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने चांगले कर्जदार बँकेस मिळवून देण्यास सहकार्य करावे. तसेच पुढील अप्रिय गोष्टी टाळण्यासाठी टर्म लोन कर्जदारांनी नियमितपणे हप्ते भरून व सी.सी. कर्जदारांनी वेळेवर व्याज भरून कर्ज खाते नूतनीकरण करून घेण्याचे सहकार्य करावे.

**थकबाकी व एन.पी.ए.व्यवस्थापन**

अहवाल सालात वर्षाचे सुरुवातीपासूनच थकबाकी व एन.पी.ए.चे प्रमाण मर्यादेत ठेवण्याचे धोरण बँकेने अवलंबिले आहे. थकबाकी ही बँकेच्या स्थैर्यावर, प्रगतीवर व नावलौकीकावर परिणाम करणारी बाब असल्याने कठीण थकबाकीदाराविरुद्ध वसुलीसाठी नाईलाजास्तव कठोर कारवाई करावी लागते. संबंधित थकीत कर्जदार योग्य तो प्रतिसाद देऊन आपले थकित कर्ज खाते बेबाक करतील अशी अपेक्षा आहे. कोरोना महामारी, दुष्काळी परिस्थिती व आर्थिक मंदी यामुळे ढोबळ एन.पी.ए प्रमाण २२.२१ टक्के आणि निव्वळ एन.पी.ए. प्रमाण १५.६१ टक्के इतके सांभाळणे शक्य झाले आहे.

**गुंतवणूक**

दिनांक ३१ मार्च २०२० अखेर बँकेची एकूण गुंतवणूक रु. ६८८७.४५ लाख इतकी होती. दिनांक ३१ मार्च २०२१ अखेरीस रु. ६४१८.६७ लाख इतकी गुंतवणूक झाली आहे. मा. रिझर्व बँकेच्या नियमाप्रमाणे एन.डी.टी.एल. च्या १८.०० टक्के प्रमाणे सरकारी कर्ज रोख्यात गुंतवणूक करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे मार्च २०२१ अखेर रु. ३५१३.०६ लाख इतकी सरकारी कर्जरोख्यात गुंतवणूक केली आहे. एकूण गुंतवणूकीमध्ये याचा समावेश आहे.

**आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब**

सध्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात बँकिंग सहकार क्षेत्र मागे असता कामा नये याचा विचार करून आपल्या बँकेने पुढील बाबी पूर्ण केल्या आहेत.

– CBS प्रणाली, नेट बँकिंग
– अद्यावत Data Center (D.C)
– RTGS/NEFT फंड्स ट्रान्सफर सुविधा
– SMS बँकींग सुविधा
– जी.एस.टी. व इनकम टॅक्स भरण्याची सुविधा
– आधुनिक नोट काऊंटींग मशीन व शॉर्टिंग मशीन
– CTS चेकबुक फॅसिलीटी
– मिस्ड कॉल अलर्ट सेवा

**वैधानिक लेखापरीक्षण**

**मे. बाहुबली अ. शहा ॲन्ड कंपनी, चार्टड अकौटंट्स, सी.ए. श्री. ऋषिकेश अ. शहा सोलापूर** यांनी आपल्या बँकेचे सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण पूर्ण केलेले आहेत. लेखापरिक्षणावेळी त्यांनी केलेले मार्गदर्शन व सूचना मोलाचे असून ते बँकेच्या प्रगतीच्या दृष्टीने योग्यच आहे. वैधानिक लेखापरीक्षक यांनी बँकेला ऑडीट वर्ग 'अ' दिलेला आहे. त्यांच्या बहुमोल सूचनांबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

**अंतर्गत लेखापरीक्षण**

सन २०२०-२१ चे अंतर्गत लेखापरीक्षणाचे काम **सी.ए. श्री. श्रीकिरण रमेश सग्गम ॲण्ड असोसिएट्स, सोलापूर** यांनी सर्व शाखांचे पूर्ण केलेले आहे. अंतर्गत लेखापरीक्षणावेळी त्यांनी केलेल्या सूचना, मार्गदर्शन व सल्ला याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

**मा. रिझर्व्ह बँकेची तपासणी**

मा. रिझर्व बँक ऑफ इंडिया यांनी दि. ३१/०३/२०२० अखेर तपासणी केले असून बँकेचे कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले आहे.

**प्रशिक्षण**

बँकेच्या संचालक मंडळास तसेच कर्मचारी वर्गास ऑनलाईन वेबीनार चर्चासत्राद्वारे प्रशिक्षण देत असून, सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन, नॅशनल फेडरेशन ऑफ अर्बन को-ऑप. बँक्स, कॉलेज ऑफ ॲग्रीकल्चरल बँकिंग (CAB) आरबीआय पुणे, यांच्या मार्फत ऑनलाईन चर्चासत्र मार्फत प्रशिक्षण दिले जाते. या प्रशिक्षणामुळे बदलते धोरण, बदलणारे कायदे, भविष्यात येणाऱ्या अडचणी याविषयी माहिती होते.

**संचालक मंडळ व इतर समिती सभा**

अहवाल सालात संचालक मंडळाच्या १४ सभा झाल्या आहेत. त्याशिवाय वेळोवेळी नियमानुसार कर्ज वाटप समिती, वसुली समिती व इतर सर्व उपसमित्यांच्या बैठका झालेल्या आहेत. सर्व सभांचे कामकाज एकमताने, खेळीमेळीने व यथायोग्य पार पाडण्यासाठी सर्व संचालकांनी मला मनापासून सहकार्य केलेले आहेत. बहुसंख्य संख्येने संचालक प्रत्येक सभेस हजर राहून माहिती घेतात व आवश्यक त्या सूचना करीत असतात हे नमूद करताना मला आनंद होतो.

**संचालक व त्यांच्या नातेवाईकांना दिलेली कर्जे –**

मा. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या निकषानुसार दि. ३१ मार्च २०२१ अखेर मा. संचालक व त्यांच्या नातेवाईकांस कोणत्याही प्रकारचे कर्ज दिले नाही.

**सेवक वर्ग**

बँकेची सर्वांगीण प्रगती होणेसाठी सभासद, ठेवीदार, खातेदार आणि हितचिंतक यांचे सहकार्य आहेच. त्या इतकाच महत्त्वाचा घटक म्हणून सेवक वर्गाचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. बँकेच्या ध्येय धोरणाची योग्य दिशा ठरल्यानंतर धोरणाप्रमाणे त्याची तळमळीने यशस्वीरीत्या अंमलबजावणी करण्याची जबाबदारी बँक अधिकारी व कर्मचारी यांच्यावर येते, ती त्यांनी अतिशय निष्ठेने पार पाडलेली आहे. बँकेत एकूण ५० कर्मचारी असून बँकेचे कामकाज अतिशय सुरळीत चालू आहे. यामुळे बँकेचे सर्व कर्मचारी अधिकारी हे अभिनंदनास पात्र आहेत. या पुढेही त्यांच्याकडून बँकेच्या प्रगतीच्या दृष्टीने अशाच अपेक्षा आहेत.

**नफा व नफा विभागणी**

मा. रिझर्व्ह बँकेच्या अद्यावत परिपत्रकामधील तरतूदी व सूचना विचारात घेऊन चालू वर्षाचा ताळेबंद व नफातोटा पत्रक काढलेले आहे. बँकेस एकूण ढोबळ नफा रु. १४२.५१ लाख इतका झालेला असून त्यामधून इन्कमटॅक्स करीता रु. ४८ लाख, संशयित व बुडीत निधीकरीता रु. ६६.१९ लाख व लेखापरीक्षकांचे फी रु. ५ लाख असे एकूण तरतूद रक्कम रु. ११९.१९ लाख वजा जाता शिल्लक राहिलेल्या रु. २३.३२ लाख निव्वळ नफ्याची विभागणी खालीलप्रमाणे करावी अशी संचालक मंडळाची शिफारस असून कृपया त्यास मंजूरी द्यावी ही विनंती.

| अ.क्र. | तपशील | रक्कम रु. |
|---|---|---|
| १ | राखीव निधी | ६,००,०००.०० |
| २ | लाभांश देय | १७,३०,०००.०० |
| ३ | धर्मदाय निधी | १८४६.२९ |
| | **एकूण** | **२३,३१,८४६.२९** |

**आभार –**

दि. १९ जून १९९७ रोजी स्व.श्री. शरदचंद्र खुशालचंद गांधी यांनी लावलेल्या रोपाचे आज वटवृक्ष झालेला दिसून येतो. गेल्या २३ वर्षामध्ये बँकेने केलेली प्रगती ही आपण सर्व सभासद, ग्राहक, हितचिंतक, ठेवीदार, कर्जदार यांनी सुज्ञपणे आमचेवर दृढविश्वास ठेवून केलेल्या सहकार्यामुळे बँकेची प्रगती करणे शक्य झाले आहे. या पुढील वाटचालीतसुद्धा आपणांकडून अशीच साथसंगत लाभेल असा मला आत्मविश्वास वाटतो. आज विद्यानंद बँकेचे कार्यक्षेत्र सोलापूर, पुणे, सांगली, सातारा, अहमदनगर व उस्मानाबाद जिल्हे आहेत. बँकेच्या स्थापनेपासून ऑडीट वर्ग 'अ' व तो यावर्षी देखील आपण राखलेला आहे. बँकेने सभासदांना आजपर्यत त्यांनी घेतलेल्या शेअर्सच्या रकमेपेक्षा जास्त लाभांश वाटप केलेला आहे. हे सर्व मा. सभासद व ग्राहकांच्या पाठबळामुळे शक्य झाले आहे. गेल्या आर्थिक वर्षाचा थोडक्यात आढावा मी आपल्यासमोर मांडला आहे. बँकींग क्षेत्रातील तिव्र स्पर्धा, मा. रिजर्व बँकेचे नवनवीन धोरण, माहिती व तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे संगणक क्षेत्रातील नवनवीन बदल यामुळे बँकींग व्यवसाय चालविणे जिकरीचे होत आहे. अशा परिस्थितीतही सर्व बाबतीत सतर्क राहून प्रगतीच्या वेगात बँकेने सातत्य राखले आहे.

बँकेच्या ज्या कर्जदारांनी आपले कर्ज विहीत वेळेमध्ये परतफेड केली आहे त्यांचे बँकेच्यावतीने आभार तसेच जे कर्जदार थकीत आहेत त्यांच्यावर १०१ ची व इतर कायदेशीर कारवाई करण्यात येईल व भविष्यात अशा कर्जदारास बँकेकडून कोणत्याही प्रकारचा कर्ज पुरवठा केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

अहवाल वर्षात मा. भारतीय रिझर्व्ह बँक, मुंबई व नागपूर, मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे, मा.श्री. शैलेशजी कोतमिरे साहेब, अतिरिक्त सहकार आयुक्त, पुणे, मा. श्री. कुंदन भोळे साहेब, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सोलापूर, मा. श्री. सुरेश काकडे साहेब, जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग -१, सहकारी संस्था, सोलापूर, या व इतर कार्यालयामधील विविध पदाधिकारी आणि अधिकारी वर्ग यांनी बँकेस वेळोवेळी जे सहाय्य केले व मार्गदर्शन केले त्या सर्वांचा मी व मा. संचालक मंडळाच्या वतीने आभार मानतो.

आपला
**श्री. सुधीर शरदचंद्र गांधी**
अध्यक्ष

**✲ श्रद्धांजली ✲**

अहवाल सालात दिवंगत झालेल्या भारतातील आणि महाराष्ट्राच्या सामाजिक शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिक, साहित्यिक, कला आदि विविध क्षेत्रातील थोर व्यक्ती तसेच आपल्या बँकेचे दिवंगत सभासद, ठेवीदार, खातेदार, हितचिंतक यांना आम्ही भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करीत आहोत.

## * ३१ मार्च २०२१ अखेरचे ताळेबंद पत्रक *

| ३१ मार्च २०२० रुपये | भांडवल व देणी | रुपये | ३१ मार्च २०२१ रुपये |
|---|---|---|---|
| <u>२५,००,००,०००.००</u> | <u>१) अ) अधिकृत भाग भांडवल</u> | | <u>२५,००,००,०००.००</u> |
| | (२,५०,००० भाग प्रत्येकी रु. १००० चा एक प्रमाणे) | | |
| <u>४,३०,०३,१००.००</u> | <u>ब) वसुल भाग भांडवल</u> | | <u>५,२०,७४,९७५.००</u> |
| <u>१४,९०,७२,०६९.१९</u> | <u>२) गंगाजळी व इतर निधी</u> | | <u>१६,३२,४३,७०२.४२</u> |
| ५,२४,८०,२८३.४७ | अ) राखीव निधी | ५,८२,७७,१८०.७८ | |
| ३२,६४,८१६.४० | आ) डिव्ही.इक्वी. फंड | ३२,६४,८१६.४० | |
| १,९१,६३,०००.०० | इ) बिल्डींग फंड | १,५८,११,८२६.९२ | |
| २५,५८९.२४ | ई) धर्मादाय फंड | २५,५८९.२४ | |
| ६,५६,५४,१४७.८१ | उ) संशयित व बुडीत कर्ज निधी | ७,५७,७३,५६८.८१ | |
| २५,००,०००.०० | ऊ) स्पेशल संशयित व बुडीत कर्ज निधी | २५,००,०००.०० | |
| ३९,६९,९७६.५९ | ए) स्टँडर्ड असेट तरतूद | ३९,६९,९७६.५९ | |
| २,३८,२२६.६८ | ऐ) गुंतवणूक चढउतार निधी | २,३८,२२६.६८ | |
| १७,४८,३०२.०० | ओ) ग्रॅच्युइटी फंड | ३३,५४,७९०.०० | |
| २७,७२७.०० | औ) सभासद कल्याण निधी | २७,७२७.०० | |
| <u>१६२,६६,८८,६२५.११</u> | <u>३) ठेव व अन्य खाती</u> | | <u>१६३,१८,६५,०२७.२७</u> |
| ७,८२,५१,७९९.२० | अ) चालू ठेवी | ५,५०,४८,२३०.५४ | |
| १७,८२,४३,१४९.४५ | आ) बचत ठेवी | १६,६६,३३,४०६.७७ | |
| ९२,४६,९८,०८९.४६ | इ) पुनर्गुंतवणूक ठेवी | ९३,८८,६१,८९८.९६ | |
| ५,०५,८५,०७४.०० | ई) दाम दुप्पट ठेवी | ४,५७,०२,८१०.०० | |
| ३८,१४,०५,३७४.०० | उ) मुदत ठेवी | ४१,१६,०१,९२९.०० | |
| ७३,४३,९००.०० | ऊ) आवर्तक ठेवी | ७५,०६,७६९.०० | |
| १,१७,६०५.०० | ए) पिग्मी ठेवी | १,१३,९५५.०० | |
| ६०,१५,६३४.०० | ऐ) मुदत ठेवी (स्टाफ सेक्युरिटी) | ६३,६८,०२८.०० | |
| २८,०००.०० | ओ) पिग्मी सिक्युरीटी डिपॉझीट | २८,०००.०० | |
| **१८१,८७,६३,७९४.३०** | **बेरीज पुढील पानावर** | | **१८४,७१,८३,७०४.६९** |

## * ३१ मार्च २०२१ अखेरचे ताळेबंद पत्रक *

| ३१ मार्च २०२० रुपये | जिंदगी व येणी | रुपये | ३१ मार्च २०२१ रुपये |
|---|---|---|---|
| २८९,५७,००३.०० | १) हातातील रोख शिल्लक | | ५,५९,७५,२८६.०० |
| १०,५३,५३,३९६.१९ | २) बँकातील चालू खात्यातील शिल्लक | | १३,२३,४३,३१३.४६ |
| १०,५०,३४१.७७ | अ) स्टेट बँक ऑफ इंडिया, बाळीवेस सोलापूर | १,५७,६०,९७८.०८ | |
| ४०,६२,२६७.४६ | आ) स्टेट बँक ऑफ इंडिया, अकलुज शाखा | ७,०६,९२२.२६ | |
| ०.०० | इ) सातारा डि. सी. सी. बँक, शाखा फलटण | ५१,५९,६९७.०० | |
| ९४,२९,०६७.५७ | ई) स्टेट बँक ऑफ इंडिया फलटण शाखा | १,३७,१३७.०७ | |
| १,७०,२०,७५६.१५ | उ) पंजाब नॅशनल बँक, शाखा सोलापूर | १७,८०,७०८.९५ | |
| २१,९६,०७१.०१ | ऊ) बँक ऑफ बडोदा, शाखा सोलापूर | १,१०,८१,७५५.०१ | |
| १,२५,७४,३९३.०० | ए) कॅनरा बँक, सोलापूर | ४,०१,७३१.२० | |
| २,०९,४६,६५०.५८ | ऐ) बँक ऑफ इंडिया, चाटी गल्ली, सोलापूर | २,९१,२१,३२७.३९ | |
| २,०२,६६,५५६.९४ | ओ) बॅक ऑफ इंडिया, नातेपुते शाखा | २१,८८,९२७.१० | |
| ४,५९,८४५.१६ | औ) महाराष्ट्र राज्य सह. बँक, मुंबई | ४,५९,८४५.१६ | |
| ७,९७,६९९.७५ | क) सोलापूर जि.म.सह.बँक, नातेपुते शाखा | १,५१,२०,८५६.५५ | |
| १,४२,३०४.९४ | ख) सोलापूर जि.म.सह.बँक, अकलूज शाखा | ३१,३५,४७९.१४ | |
| ७०,९७८.९५ | ग) सोलापूर जि.म.सह.बँक, (मुख्य) सोलापूर | ५,५८,१०३.९५ | |
| ८,०५,२१७.०० | घ) सोलापूर जि.म.सह.बँक, पंढरपूर शाखा | ३०,७४,७६१.८० | |
| १०,०००.०० | च) इंडसइंड बँक, सोलापूर | ३६,७०४.०० | |
| ११,२६०.१० | छ) आय.डी.बी.आय. पंढरपूर शाखा | १९,७५७.९६ | |
| ९,४०,२७६.२१ | ज) एच.डी.एफ.सी. बँक मुंबई (डी.डी) | १२,४८,२३३.६३ | |
| ७९,९४१.०० | झ) एच.डी.एफ.सी. बँक अकलुज शाखा | ७९,९४१.०० | |
| २२,८०,६८९.३४ | ट) एच.डी.एफ.सी. बँक इंदापूर शाखा | ८६,०५,३४७.०४ | |
| १०,९५,६७७.९८ | ठ) आय.सी.आय.सी.आय. शाखा बाळीवेस सोलापूर | ५२,७१,७८९.९८ | |
| २९,५०,७८४.६२ | ड) आय.सी.आय.सी.आय, नातेपुते शाखा | ५९,९०,३३१.७५ | |
| १,०६,६५९.३२ | ढ) ॲक्सीस बँक लि. सोलापूर | १,००,६५९.३२ | |
| - २१,१५,६७४.४८ | ण) ॲक्सीस बँक लि. सोलापूर (आर.टी.जी.एस.) | ४,१७,७०१.०२ | |
| ४,४२,१२९.३८ | त) ॲक्सीस बँक लि. नातेपुते शाखा | ४,४२,०९७.५२ | |
| १३,४३,१०,३९९.१९ | बेरीज पुढील पानावर | | १८,८३,१८,५९९.४६ |

## * ३१ मार्च २०२१ अखेरचे ताळेबंद पत्रक *

| ३१ मार्च २०२० रुपये | भांडवल व देणी | रुपये | ३१ मार्च २०२१ रुपये |
|---|---|---|---|
| १८१,८७,६३,७९४.३० | बेरीज मागील पानावरून | | १८४,७१,८३,७०४.६९ |
| ३१,१६,४३१.०० | ४) देणे व्याज | | ३९,८२,२७३.०० |
| २४,५०,३८६.०० | अ) मुदत ठेवीवरील व्याज | ३३,७३,८६९.०० | |
| ६,६६,०४५.००. | आ) आवर्तक ठेवीवरील व्याज | ६,०८,४०४.०० | |
| ६४,१२,७३८.८६ | ५) इतर देणी | | ८३,५१,८९७.२२ |
| २,४७,१९२.०० | अ) पे ऑर्डर पेयेबल | २,४२,६४७.५६ | |
| ३४,१५४.२५ | आ) टी.डी.एस.देणे | ०.०० | |
| ५,००,०००.०० | इ) ऑडीट फी देणे | ५,००,०००.०० | |
| ५,८८,५०८.०० | ई) डिव्हिडंड देणे २०१६-२०१७ | ०.०० | |
| ११,५९,२६६.०० | उ) डिव्हिडंड देणे २०१७-२०१८ | ११,४३,०६६.०० | |
| २९,००,०००.०० | ऊ) टॅक्स प्रोव्हिजन | ४८,००,०००.०० | |
| १,०९,०७०.०० | ए) शेअर होल्डर देणे | १,०८,३२०.०० | |
| ३२,९६२.११ | ऐ) जी.एस.टी. देणे | १,०८,२७२.१६ | |
| १,००,०००.०० | ओ) विज बिल व टेलिफोन बिल तरतूद | ८०,०००.०० | |
| ०.०० | औ) इतर तरतूद | ५,००,०००.०० | |
| २०,६७७.०० | अं) डिफ देणे | ०.०० | |
| ७,२०,९०९.५० | अः) स्टेल डी.डी. व चेक्स | ७,२०,९०९.५० | |
| ०.०० | क) पी.एफ व व्यवसाय कर देणे | १,४८,६८२.०० | |
| ०.०० | ६) बाहेरील कर्जे | | ०.०० |
| ६,०२,९५,४२७.३५ | ७) दुबेरजी | | ८,५०,००,५६८.३५ |
| ५७६,८०,५२०.९९ | अ) एन.पी.ए. व्याज | ८,२६,५४,२०४.९९ | |
| १,९१,४६९.०० | आ) वसुलीस आलेली बिले | २,१३,५७६.०० | |
| ७,६१,८५०.०० | इ) बँक गॅरंटी | ४,१६,३५०.०० | |
| ४,२४,५८६.११ | ई) डिफ खाते | ४,३६,७७७.११ | |
| १२,३७,००१.२५ | उ) इतर खर्च | १२,७९,६६०.२५ | |
| ०.०० | ८) शाखा समन्वय खाते | | ०.०० |
| १८८,८५,८८,३९१.५१ | बेरीज पुढील पानावर | | १९४,४५,१८,४४३.२६ |

## * ३१ मार्च २०२१ अखेरचे ताळेबंद पत्रक *

| ३१ मार्च २०२० रुपये | जिंदगी व येणी | रुपये | ३१ मार्च २०२१ रुपये |
|---|---|---|---|
| १३,४३,१०,३९९.१९ | बेरीज मागील पानावरून | | १८,८३,१८,५९९.४६ |
| २१,२५,६८४.५० | थ) आय.डी.बी.आय.बँक लि. शाखा नवीपेठ सोलापूर. | १,५९,३१८.३० | |
| ४७,७१,३९२.३२ | द) एच.डी.एफ.सी बँक, सोलापूर (सी.टी.एस) | ७८,४७,७४०.२५ | |
| ५,९६,७५२.२७ | ध) एच.डी.एफ.सी बँक, सोलापूर (आर.टी.जी.एस) | १,३३,२९,८७६.१८ | |
| २२,३५,६७३.३५ | न) आय.डी.बी.आय.बँक लि. शाखा फलटण | १,०५,५८४.८५ | |
| ६८,८७,४५,३२२.०० | **३) गुंतवणूक** | | ६४,१८,६७,०२६.०० |
| ३१,१८,६९,६६०.०० | अ) सेंट्रल गर्व्हनमेन्ट सेक्युरिटीज | ३२,१३,५१,६६०.०० | |
| २,९९,५५,०००.०० | आ) स्टेट गर्व्ह. सेक्युरिटीज् | २,९९,५५,०००.०० | |
| १२,००,००,०००.०० | इ) म्युच्यूअल फंड | ०.०० | |
| १,०००.०० | ई) महाराष्ट्र राज्य सह. बँक मुंबई (शेअर्स) | १,०००.०० | |
| ५,२४,००,०००.०० | उ) कॅनरा बँक सोलापूर (रिझर्व फंड) | ६,२२,८५,७६८.०० | |
| ५०,४१,९१८.०० | ऊ) डी.सी.सी.बँक (एफ.डी) | ५०,४१,९१८.०० | |
| १७,४८,३०२.०० | ए) एल.आय.सी. ऑफ इंडिया ग्रुप ग्रॅच्युटी | ३३,५४,७९०.०० | |
| ०.०० | ऐ) नॅशनल बँक (एफ.डी) | ९,४८,५०,०००.०० | |
| १६,७७,२९,४४२.०० | ओ) इतर बँकेतील गुंतवणूक | १२,५०,२६,८९०.०० | |
| ९७,२९,२२,५२४.९२ | **४) कर्जे** | | १००,११,९५,१२४.९८ |
| १२,५१,५२,८९३.९६ | अ) मुदत ठेव तारण कर्जे | ४,१६,९१,७६३.९८ | |
| २७,२१,२५,९१८.५६ | आ) तारण कर्ज | २२,५४,२३,५९७.५६ | |
| १,५०,४१,८४९.०० | इ) विनातारण कर्ज | १,२२,६३,३१७.०० | |
| ७,५९,५१,४५५.०० | ई) व्यवसाय कर्ज | १३,०७,१०,३००.७० | |
| १७,९९,४४,४६३.३० | उ) नजरगहाण कॅश क्रेडीट | २२,९८,९७,८००.१८ | |
| ४,४०,८७,५४५.०० | ऊ) गृह कर्जे | ६,०६,७९,९९५.०० | |
| १३,७३,२०,४७३.४६ | ऐ) मुदत कर्जे | ११,९०,७५,६९२.४६ | |
| ०.०० | ओ) सेक्युरिटी तारण कर्जे (वेअरहाऊस) | १,२९,९९८.०० | |
| ४७,१४,५८१.०० | औ) इंडस्ट्रियल लोन (प्लॅट अॅन्ड मशिनरी) | २२,४५,८०९.०० | |
| १,०९,८१,७११.०० | क) वाहन तारण कर्जे | १,११,४८,१९३.०० | |
| २,१३,२५,४५०.०० | ख) पगार तारण व कर्मचारी कर्ज | ८९,२८,५५२.०० | |
| ७,८०,७३,७१५.६४ | ग) अॅडव्हान्स टू कॉन्ट्रॅक्टर | ७,९२,६०,८२१.१० | |
| ८२,०२,४६९.०० | घ) सोने तारण कर्ज | ७,९७,३९,२८५.०० | |
| ४७,४९,३०९.०० | **५) येणे व्याज** | | ९३,३३,४३०.०० |
| ४७,४९,३०९.०० | अ) गर्व्हनमेंट सेक्युरिटीवरील येणे व्याज | ४५,९०,२७८.०० | |
| ०.०० | आ) मुदत ठेवीवरील येणे व्याज | ४७,४३,१५२.०० | |
| १८०,०७,२७,५५५.११ | बेरीज पुढील पानावर | | १८४,०७,१४,१८०.४४ |

# * ३१ मार्च २०२१ अखेरचे ताळेबंद पत्रक *

| ३१ मार्च २०२० रुपये | भांडवल व देणी | रुपये | ३१ मार्च २०२१ रुपये |
|---|---|---|---|
| १८८,८५,८८,३९१.५१ | **बेरीज मागील पानावरून** | | १९४,४५,१८,४४३.२६ |
| १८,४८,८२६.९२ | **९) नफा-तोटा खाते** | | २३,३१,८४६.२९ |
| | मागील वर्षाचा नफा | १८,४८,८२६.९२ | |
| | वजा विनियोग | १८,४८,८२६.९२ | |
| | एकूण शिल्लक | ०.०० | |
| | चालु वर्षाचा नफा | २३,३१,८४६.२९ | |
| | (नफा तोटा पत्रकावरून) | | |
| १८९,०४,३७,२१८.४३ | **एकूण बेरीज** | | १९४,६८,५०,२८९.५५ |

**श्री. चंद्रकांत वाणी**
(सरव्यवस्थापक)

**श्री. जे. एस. कुलकर्णी**
(तज्ञ संचालक)

**श्री. आर.बी. शहा (सी.ए)**
(तज्ञ संचालक)

## * ३१ मार्च २०२१ अखेरचे ताळेबंद पत्रक *

| ३१ मार्च २०२० रुपये | जिंदगी व येणी | रुपये | ३१ मार्च २०२१ रुपये |
|---|---|---|---|
| १८०,०७,२७,५५५.११ | **बेरीज मागील पानावरून** | | १८४,०७,१४,१८०.४४ |
| **१,१७,४३,९५९.०६** | **६) मालमत्ता (घसारा वजा जाता)** | | १,००,५७,५७८.६५ |
| ४९,००,८२१.०३ | अ) फर्निचर ॲन्ड फिक्चर्स | ४१,३२,७६८.४२ | |
| ४५,७०,१४९.९३ | आ) डेड स्टॉक | ४१,६४,३९४.४३ | |
| २२,७२,९८८.१० | इ) कॉम्प्युटर मशिनरी,बँकिंग कॉम्प्यु. सॉफ्टवेअर | १७,६०,४१५.८० | |
| **१,७६,७०,२७६.९१** | **७) इतर येणी** | | १,१०,७७,९६२.११ |
